# १४. आदर्शवादी मुळगावकर

स्वाध्याय

प्रश्न. 1. योग्य उदाहरण लिहा.

1) **मुळगावकर यांचा आदर्शवाद**

उत्तर :

**मुळगावकर यांचा आदर्शवाद**

टेल्कोचा कारखाना व त्याचे उत्पादन

2) **मुळगावकर यांची सामाजिक दृष्टी**

उत्तर :

**मुळगावकर यांची सामाजिक दृष्टी**

वृक्षपेढीसारखा कल्पक उपक्रम

प्रश्न. 2. आकृती पूर्ण करा.

**मुळगावकर यांचे गुणविशेष**

उत्तर :

**मुळगावकर यांचे गुणविशेष**

- ध्येयवादी
- सचोटी
- कार्यक्षमता
- सज्जनपणा

**मुळगावकर यांची कर्तव्यदक्षता**

उत्तर :

**मुळगावकर यांची कर्तव्यदक्षता**

- थोड्याच दिवसांत देशी बनावटीची मालमोटार तयार करण्याची सरकारची अट पूर्ण केली.
- उत्पादनाच्या दर्जाबाबत कमतरता खपवून घेतली नाही.
- तंत्रज्ञ घडवण्याचे कर्तव्य पार पाडले.
- कारखाना अवाढव्य वाढवून तो हाताबाहेर जाऊ दिला नाही.

प्रश्न. 3. खाली काही उदाहरणे दिली आहेत. या उदाहरणांवरून मुळगावकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे तुम्हांला जाणवलेले पैलू लिहा.

अ)

**मुळगावकरांनी केलेले सामाजिक कार्य**

उत्तर :

**मुळगावकरांनी केलेले सामाजिक कार्य**

i) सहानुभूती
ii) अनुकंपा
iii) मूलभूत सुधारणांवर भर देणारी दृष्टी

आ)

**आदर्श कारखान्यासाठी मुळगावकरांनी घेतलेले निर्णय**

उत्तर :

**आदर्श कारखान्यासाठी मुळगावकरांनी घेतलेले निर्णय**

i) उत्पादनात सतत सुधारणा करण्यासाठी संशोधन विभाग निर्माण करणे.
ii) कारखाना सुरू करण्यापूर्वी सर्व थरातील तंत्रज्ञ कंपनीकडून शिकवून तयार करणे.
iii) सर्व दर्जाच्या व्यवस्थापकांनी रोज कारखान्यात फेरी मारलीच पाहिजे असा दंडक होतात.
iv) सुटे भाग तयार करण्याची दक्षता घेणे.

प्रश्न. 4. वैशिष्ट्ये लिहा.

अ) लंडनच्या स्थापत्य विषयाची पदवी -
उत्तर :
पुस्तकी शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष काम करावे लागे व मगच पदवी मिळे.

आ) टेक्लोचा पुण्यातील कारखाना -
उत्तर :
उत्पादन व व्यवस्थापन दोन्ही दृष्टींनी पहिल्या दर्जाचा.

इ) टेल्कोची परंपरा -
उत्तर :
सर्व दर्जाच्या व्यवस्थापकांनी कारखान्यात रोज फेरी मारलीच पाहिजे.

ई) टेल्कोची मालमोटार -
उत्तर :
टेल्कोच्या मालमोटारी पहिल्या दर्जाच्या तयार झाल्या आणि त्यात सतत सुधारणा होत गेली.

प्रश्न. 5. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून, अर्थ न बदलता वाक्य पुन्हा लिहा.

अ) मुळगावकर <u>अबोल</u> प्रवृत्तीचे होते.
उत्तर :
मुळगावकर <u>बोलक्या</u> प्रवृत्तीचे होते.

आ) मुळगावकर पदवी घेऊन आले, तेव्हा भारतात <u>मंदीची</u> लाट होती.
उत्तर :
मुळगावकर पदवी घेऊन आले, तेव्हा भारतात <u>तेजीची</u> लाट होती.

इ) मुळगावकरांचे जीवन असमाधानी नव्हते.
उत्तर :
मुळगावकरांचे जीवन समाधानी नव्हते.

प्रश्न. 6. अधोरेखित केलेल्या अर्थाचा वाक्प्रचार पाठातून शोधून लिहा.

अ) प्रकृतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे यश वारंवार आजारी पडत होता.
उत्तर :
प्रकृतीकडे हेळसांड केल्यामुळे यश वारंवार आजारी पडत होता.

आ) शेतीत खूप कष्ट केल्यामुळे यावर्षी रामरावांच्या कष्टाला चांगले फळ मिळाले.
उत्तर :
शेतीत जीव तोडून काम केल्यामुळे यावर्षी रामरावांच्या कष्टाला चांगले फळ मिळाले.

इ) आवाक्याबाहेरचे काम समीरने सन्मार्गाने पूर्ण केले.
उत्तर :
हाताबाहेरचे काम समीरने सन्मार्गाने पूर्ण केले.

ई) स्वत:च्या तत्त्वांशी समझोता करणे योग्य नव्हे.
उत्तर :
स्वत:च्या तत्त्वांशी तडजोड करणे योग्य नव्हे.

## प्रश्न. 7. स्वमत.

**अ) पाठात उल्लेख असलेल्या चिनी म्हणीतील विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

उत्तर :

'तुम्हाला तीस वर्षांची योजना आखायची असेल, तर झाडे लावा आणि शंभर वर्षांची योजना करायची असेल तर माणसे तयार करा.' अशी एक चिनी म्हण आहे. यातला विचार असा आहे की, पर्यावरणाचे संतुलन राखणे मानवी जीवनाकरिता आवश्यक असते आणि ते संतुलन राखण्यासाठी त्याची तयारी तीस वर्षे आधीपासून करावी लागते, तीस वर्षे आधीपासून झाडे लावावी लागतात. तसेच माणसे घडवणे, माणसांचे प्रगतिशील विचार घडवणे हे राष्ट्रविकास, राष्ट्रोन्नती, राष्ट्रहित याकरिता फार महत्त्वाचे असते. असा समाज घडवण्याकरिता शंभर वर्षांचा कालावधी लागतो. म्हणून समाजजागृतीची सुरुवात शंभर वर्षे पूर्वीपासूनच केली पाहिजे. म. फुले यांनी स्त्री शिक्षणाच्या योजनेची सुरुवात शंभर वर्षांपूर्वी केली तेव्हा आता कुठे सर्व क्षेत्रात स्त्रिया कार्यरत झाल्या आहेत.

**आ) टेल्कोच्या मालमोटरीच्या ड्रायव्हरशी संवाद साधण्यामागे मुळगावकरांचे कोणते हेतू असावेत, असे तुम्हांस वाटते ?**

उत्तर :

मालक व कामगार यांच्यात भावनिक जवळीक निर्माण व्हावी, टेल्को मोटर कशी चालते यांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यात काही उणिवा असतील तर त्या दूर करता याव्या. मोटर चालवताना काही अडचणी येत असतील तर त्या अडचणींचे निराकरण करावे. हे टेल्कोच्या मालमोटरीच्या ड्रायव्हरशी संवाद साधण्यामागे मुळगावकरांचे हेतू असावेत.